महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८२ वा | दिनांक : १०/०९/२०२५ | वार : बुधवार

## जीआरला हात लावल्यास सरकारला शांत बसू देणार नाही - मनोज जरांगेंचा इशारा



**मुंबई** : मराठा आरक्षणाचा जीआर काढण्यापूर्वी मला विश्वासात घेतले नाही. मला त्याबाबतची कल्पना दिली नसल्याचे ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. तर तुम्हाला कल्पना द्यायला तुम्ही सरकारचे बाप आहात का? असा सवाल मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांना केला. तसेच जीआरला हात लावल्यास सरकारला शांत बसू देणार नाही, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या जीआरवरून ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. काढलेला जीआर हा प्रचंड दबावाखाली काढल्याचा दावा करत त्यांनी यासंबंधी मुख्यमंत्र्यांना एक ८ पानी पत्र लिहिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी 'मराठा समाज' या शब्दावर जोरदार आक्षेप घेतला आहे. त्यांनी मराठा समाजाचा उल्लेख ओबीसी किंवा कुणबी अथवा मराठा - कुणबी किंवा कुणबी - मराठा असा करण्याची गरज अधोरेखित केली आहे. आता यावरून मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीने हा जीआर काढला आहे. छगन भुजबळ यांनी आठ पानाचे किंवा आठशे पानाचे पत्र देऊ द्या. मुख्यमंत्री त्याला कोलून लावणार. ते सरकारचा बाप नाही. सरकारने हेराफेरी करायची नाही. जर हेराफेरी केली तर सरकारला रस्त्याने फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. ज्या अर्थी हे कोर्टात जायला तयार झाले, जीआर बाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहायला लागलेत याचा अर्थ हा जीआर मराठ्यांसाठी खूप महत्त्वाचा आणि चांगला आहे, असे जरांगे म्हणाले.

तुम्हाला कल्पना द्यायला तुम्ही सरकारचे बाप आहात का? अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. तिथे संविधानाच्या पदावर बसलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आहेत. हे सर्व वेडे, त्यांना अक्कल नाही आणि तुम्ही एकटेच शहाणे, तुम्हाला एकट्याला अक्कल आहे का? असा सवालाही मनोज जरांगे यांनी विचारला.

आता सरकारने छगन भुजबळ यांच्या म्हणण्यावर कायदा चालवायचा का? तुम्ही एकटे सरकारला वेठीस धरत आहात का? असे प्रश्नही मनोज जरांगेंनी उपस्थित केले. देवेंद्र फडणवीसांनी भुजबळ यांना तुरुगांत पाठवले पाहिजे, अन्यथा ते सगळ्या सरकारला डाग लावतील, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

## अजित पवारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची नाराजी



**मुंबई** : सोलापूरमध्ये करमाळ्याच्या महिला आयपीएस अधिकारी डीवायएसपी अंजना कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात फोन आणि व्हिडिओ कॉलवरून जोरदार वाद झाला होता. या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. या विषयी प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी या प्रकरणाचा अहवाल अद्याप आपल्याकडे आला नसल्याचे सांगितले आहे.

डीवायएसपी अंजली कृष्णा या रस्ते बांधकामासाठी बेकायदेशीर वाळू उत्खननाच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी माढा तालुक्यातील कुर्डू गावात पोहोचल्या होत्या. गावकरी आणि घटनास्थळी असलेल्या अधिकाऱ्यामध्ये वाद झाला. या वादातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ता बाबा जगताप यांनी थेट अजित पवारांना कॉल लावला होता. त्यानंतर अजित पवारांनी या महिला अधिकाऱ्याला दम भरल्याचे समोर आले होते. या प्रकरणानंतर अजित पवार यांनीही स्पष्टिकरण दिले होते. याविषयी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील भूमिका स्पष्ट केली आहे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी महायुती सरकारकडून मोठी व दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. नमो शेतकरी महासमान योजनेअंतर्गत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात पुढचा हप्ता जमा केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील तब्बल ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे १८९२ कोटी ६१ लाख रुपये थेट जमा करण्यात आले आहेत. या योजनेनुसार शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सम्मान निधीतील सहा हजार रुपये आणि राज्य सरकारकडून मिळणारे अजून सहा हजार रुपये असे मिळून दरवर्षी एकूण १२ हजार रुपयांची मदत केली जाते. या रकमेचे तीन हप्ते होतात. दर चार महिन्यांनी प्रत्येकी दोन हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतात.

सरकारचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीतील खर्च भागविण्यासाठी मदत करणे हा असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, पेरणी, बियाणे, खते आणि शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या इतर खर्चांना हातभार लागावा यासाठी ही योजना शेतकऱ्यांच्या फायद्याची ठरत आहे. राज्यातील दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती अशा संकटांचा शेतकऱ्यांवर नेहमीच परिणाम होत असतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून थेट रोख मदत केली जाणे ही दिलासादायक बाब आहे. या घोषणेमुळे शेतकऱ्यांच्या हातात अतिरिक्त रक्कम आली असून, बियाणे व खते खरेदी करण्यासाठी या पैशांचा उपयोग होणार आहे.

## लालबागचा राजा मंडळावर गुन्हा दाखल करा : मच्छीमार संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाठवले पत्र

**मुंबई** : मुंबईचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लालबागचा राजाच्या विसर्जनावर अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे पत्र पाठवून मंडळाच्या कार्यकारी समितीतील सदस्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. चंद्रग्रहणाच्या काळात बाप्पाचे विसर्जन झाल्याने लाखो भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप या पत्रात करण्यात आला आहे.

रविवारी लालबागच्या राजाचे विसर्जन तब्बल 33 तासांनंतर पार पडले. विशेष म्हणजे गिरगाव चौपाटीवर विसर्जनासाठी गुजरातमधून खास आणलेला तराफा तांत्रिक अडचणींमुळे 13 ते 14 तास अडकून पडला. या दिरंगाईमुळे विसर्जनाला वेळ लागला आणि चंद्रग्रहणाच्या वेळेतच ते पार पडले. या प्रकारामुळे मंडळाच्या व्यवस्थापनावर जोरदार टीका होत आहे. मच्छीमार कृती समितीने आपल्या पत्रात म्हटले आहे की, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचा शारीरिक आणि मानसिक छळ होत आहे. भविष्यात असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी मंडळाच्या कार्यकारी समितीतील सदस्यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, मला तक्रारीबाबत काहीही माहिती नाही. सर्व माहिती घेऊन बोलू, असे मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब कांबळे म्हणाले.

१. बाळाचा छळ करणाऱ्यांवर कारवाई करा : कार्यकर्त्यांनी लहान मुलीचा छळ केला, त्यांना अटक करून बडतर्फ करावे.

२. विसर्जन गोंधळाची चौकशी : चंद्रग्रहणात झालेल्या विसर्जनाची चौकशी करून दोषी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

३. व्हीआयपी संस्कृतीवर निर्बंध : दर्शनासाठी होणारी गर्दी आणि व्हीआयपी संस्कृतीला आळा घालण्यासाठी व्हीआयपी दर्शन फक्त एका दिवसापुरते मर्यादित ठेवावे आणि मंडपातील देखावा मोकळा ठेवावा, जेणेकरून सामान्य भक्तांना सहज दर्शन घेता येईल.

४. कोळी समाजाला मान : बाप्पांची स्थापना करणाऱ्या मूळ कोळी समाजाला विसर्जन सोहळ्याचा मान पुन्हा द्यावा आणि एक दिवस आगरी-कोळी बांधवांसाठी राखीव ठेवावा.

मच्छीमार समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल म्हणाले, लालबागच्या राजाला सामान्य भाविकांमुळे प्रसिद्धी मिळाली. मंडळाने उत्सवाचे पूर्णपणे बाजारीकरण केले आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना शारीरिक, मानसिक त्रास दिला जातो. गिरगाव चौपाटीचे नाखवा हिरालाल वाडकर म्हणाले, “गेली अनेक वर्षे आम्ही लालबागच्या राजाचे विसर्जन करत आहोत. पण यंदा गुजरातच्या तराफ्याला कंत्राट दिल्याने विसर्जनाला विलंब झाला. मंडळाने याचा विचार करणे आवश्यक आहे. सोनसाखळी चोरीच्या अनेक तक्रारीही पोलिस ठाण्यात नोंदवल्या गेल्या आहेत. या प्रकरणात 12 जणांना अटक केली असून दोन सोन्याच्या चेन जप्त करण्यात आल्या आहेत. पकडण्यात आलेल्यांची चौकशी सुरू आहे. मंडळाकडे कोट्यवधींची संपत्ती आल्यामुळे कार्यकर्त्यांना माज चढला आहे. गणपती हा सर्वांचा आहे, तो कोणा एका श्रीमंतांचा नाही. बाप्पांनीच पदाधिकाऱ्यांचा माज उतरवला आहे, असा टोलाही तांडेल यांनी लगावला. यंदा लालबाग राजाच्या विसर्जन सोहळ्याला प्रचंड गर्दी झाली होती. तब्बल 35 तास चाललेल्या या मिरवणुकीदरम्यान चोरांच्या टोळ्यांनी 100 हून अधिक मोबाइल आणि अनेक सोन्याच्या चेन लंपास केल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केल्याचे सांगण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० सप्टेंबर २०२५


## जि. प. प्रा. शाळा धोत्रा येथे विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर स्वयंम लेखन







**धोत्रा** : विद्यार्थी साहित्य संमेलन निमित्त एक पूर्वतयारी म्हणून दिनांक 8 सप्टेंबर सोमवारी विद्यार्थ्यांसाठी 'लिहिते व्हा ' हा उपक्रम जिल्हाभरात राबवण्यात येत आहे त्या अनूशंगाने जि. प. प्राथमिक शाळा धोत्रा ता. सिल्लोड येथे विद्यार्थ्यांनी स्वयम लेखन केले जसे की निबंध लेखन, प्रसंग वर्णन, संवाद लेखन, दैनंदिन लेखन, अनुभवलेखन ,आत्मकथन , मला आवडलेले पुस्तक, व्यक्ती, घटना, प्रवास वर्णन, कथालेखन, नाट्यलेखन इत्यादीवर विद्यार्थी स्वयम लेखन केले या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री जाधव सर, शिक्षक सोन्ने सर व श्रीमती सरला कामे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## देवगिरी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : देवगिरी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन ८ सप्टेंबर २०२५ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन उपप्राचार्य अरुण काटे,जेईई-नीटचे संचालक प्रा.एन.जी.गायकवाड, उपप्राचार्य प्रा.सुरेश लिपाने पर्यवेक्षक डॉ.किरण पतंगे पर्यवेक्षिका डॉ.सीमा पाटील, प्रा.चंपालाल कहाटे प्रा.बाळासाहेब पवळ प्रा.कल्याण माळी यांनी केले. शिक्षक दिनाच्या निमित्ताने एकूण ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून भावी इंजिनियर, डॉक्टर, आणि विविध क्षेत्रात होणाऱ्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांची जबाबदारी पार पाडली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले देवगिरी जेईई-नीटचे संचालक प्रा.एन. जी.गायकवाड यांनी शिक्षक हा आपल्या कार्याच्या माध्यमातून जगासमोर सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करतो आणि आयुष्यभर विद्यार्थ्यासमोर आदर्श म्हणून उभा राहून मार्गदर्शक, ज्ञानदाता, दिशादर्शक, आणि वाटाड्याची अनमोल भूमिका पार पाडतो असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य प्रा. अरूण काटे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानीमित्त दाखविलेला जोश आणि उत्साह असाच राहू द्या आणि विद्यार्थ्यांनी प्रत्येक पाऊल विश्वासपूर्ण कसे पडतील याची दक्षता घेऊन जिवनामध्ये आनंद घ्यावा असे सांगीतले.याप्रसंगी पर्यवेक्षिका डॉ.सीमा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी शिक्षक दिनानिमित्त उत्कृष्ट अध्यापन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये अनुक्रमे यश गायकवाड, भागवत किराळकर,सृष्टी बाघ, ओमकार स्वामी ,सारिका साळवे प्रेम गवळी यांचा समावेश आहे. तर विद्यार्थी उपप्राचार्य म्हणून सुमित गाडे, पर्यवेक्षक म्हणून शिवराज फलके, सिद्धांत शिंदे, साक्षी राठोड तर सेवक म्हणून राज जयस्वाल यांनी जबाबदारी पार पाडली.शिक्षक दिन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. चंपालाल कहाटे प्रा. बाळासाहेब पवळ डॉ.मनिषा नाईक प्रा.स्वाती चव्हाण डॉ.जिजा शिंदे डॉ.बाळासाहेब शिंदे प्रा.अनिता आढाव प्रा.सुलक्षणा होळकर, प्रा. शितल पाटील प्रा.सविता जाधव डॉ.प्रज्ञा कुऱ्हाडे प्रा.रवी सुरवाडे प्रा.विजय कुलेकर प्रा.अश्विनी कुंभार, प्रा. रूपाली थोरात प्रा. ज्योती कुंरुमभट्टे प्रा.अंजली पिंपरकर प्रा.शेखर जाधव व महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुमिता कुणगर,तन्वी बोराडे यांनी केले तर खुशी लंगोटे हिने आभार मानले.

## तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलचा संघ प्रथम



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत चौदा वर्ष वयोगटात प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या क्रिकेट संघाने तालुक्यातून प्रथम विजेतेपद पटकाविल्याबद्दल माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी आदींनी त्यांचे कौतुक केले. या संघाने अंतिम लढतीत फलंदाजी व गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून विजेतेपद मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली. यावेळी उमरगा तालुका क्रीडा सचिव राजेंद्र सोलंकर, सुजित शेळके, नारायण सोलंकर, जयसिंग राठोड उपस्थित होते. या विजेत्या संघामध्ये कर्णधार मयुरेश कांबळे, आदर्श मेणसे, तहलिल लोणी, विराट राजपूत, नालसाब बागवान, आणप्पा बन्ने, गौरव सरसंबे, गणेश बिराजदार, रोशनअली सुलेपेठ, आर्यन गुरव, रितेश गायकवाड, कुणाल सागर आदींचा सहभाग होता. या खेळाडूंना शिक्षक सागर मंडले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी खेळाडूंचा सत्कार मंगळवार (ता. ९ ) रोजी सच्छिदानंद अंबर, डॉ. पुरुषोत्तम बारवकर, मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, धनराज हळळे, संगमेश्वर लामजने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विरेंद्र लोखंडे, सुभाष धुमाळ, पंकज पाताळे, नेहा माने, शितल घोडके, अश्विनी क्षीरसागर, सोनाली कारभारी, तनुजा जमादार, प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, सुधाराणी पाटील, श्रीदेवी मंडले, पुजा मरबे, इंदिरा व्हट्टे, साक्षी देशमाने, जास्मिन मुल्ला आदींनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार जगदीश सुरवसे यांनी मानले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० सप्टेंबर २०२५

## दुचाकी पुलाखाली जाऊन झालेल्या अपघातात दोन जण जखमी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** छत्रपती संभाजीनगर खुलताबाद मार्गावर अब्दीमंडी गावाजवळ दि.९ मध्यरात्री १.४५ वाजेच्या सुमारास दुचाकी पुलाखाली जाऊन झालेला अपघातात साहेब खान व अबुसाहार रा. नारेगाव,छत्रपती संभाजी नगर शहर हे जखमी झाले. साहेब खान हे अबू यांच्या सोबत होंडा दुचाकी क्र,एम.एच २०,बी.पी,४७६३ वरून खुलताबाद येथून नारेगाव घराकडे जात असताना अब्दिमंडी गावाजवळ दुचाकी घसरून पुलाखाली जाऊन झालेल्या अपघातात दोन्ही जखमी झाले जखमींना जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थानच्या रुग्णवाहिकेत टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## क्षमा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना ऐक्य व शांततेचा संदेश





**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे 8 सप्टेंबर रोजी क्षमावाणी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना क्षमेचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमातून समाजात ऐक्य, शांतता व सद्भावना जपण्याचा संदेश देण्यात आला. सर्व शिक्षक वृंद तसेच मुख्याध्यापक श्री. चौधरी सर यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

## महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले नूतन प्राचार्य डॉ अस्वले यांचे अभिनंदन



**उमरगा :** शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक योगदानामुळे मराठवाड्यात लौकिक प्राप्त केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ. संजय अस्वले यांची निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा अभिनंदन आणि सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माकनी येथील बीएसएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. घनश्याम जाधव हे होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निवड समितीने प्राचार्य पदासाठी २९ ऑगस्ट रोजी मुलाखती घेतल्या. त्यात निवड समिती आणि भारत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाने डॉ. संजय अस्वले यांची प्राचार्य पदी निवड केली. त्याबद्दल महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी त्यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अविरत प्रयत्न करेल अशी ग्वाही दिली. यापूर्वी ते महाविद्यालयाचे आठ वर्ष उपप्राचार्य आणि एक वर्ष प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत होते.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य घनश्याम जाधव यांनी कुशल प्राचार्यासाठी आवश्यक असणारे सर्व गुण डॉ. अस्वले यांच्यात असल्यामुळे विविध शैक्षणिक आव्हानांच्या काळातही त्यांच्यात महाविद्यालयाला प्रगतीकडे घेवून जाण्याची क्षमता आहे, ते संस्थेच्या इतिहासात नक्कीच यशस्वी प्राचार्य ठरतील असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, डॉ. प्रवीण माने,डॉ. धनंजय माने, डॉ. विनोद देवरकर, प्रा. जी. एस. मोरे, शैलेश महामुनी आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. प्रदीप पाटील यांनी मानले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १० सप्टेंबर २०२५

# जीवनाचा सन्मान : आत्महत्या प्रतिबंधासाठी सामाजिक जाणीवेची गरज

दरवर्षी 10 सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ आत्महत्या या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नसून, तिच्या मुळाशी असलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि मानसिक घटकांवर चर्चा घडवून आणण्यासाठी असतो. आत्महत्या ही फक्त वैयक्तिक निर्णयाची परिणती नसून ती एका व्यापक सामाजिक परिस्थितीची उपज आहे, असा समाजशास्त्रीय दृष्टिकोन घेऊन पाहिले तर या समस्येची व्याप्ती आणि गांभीर्य अधिक स्पष्टपणे समजते. व्यक्तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे घटक अनेक स्तरांवर कार्यरत असतात. त्यामध्ये कुटुंबातील नातेसंबंध, आर्थिक ओढाताण, सामाजिक दबाव, बेरोजगारी, मानसिक आरोग्याचा अभाव, सांस्कृतिक अपेक्षा, राजकीय अस्थिरता, आणि आधुनिक जीवनातील एकाकीपणा इत्यादी घटकांचा समावेश होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्या प्रतिबंधाचा विचार करताना केवळ वैद्यकीय वा मानसोपचारक दृष्टिकोन पुरेसा ठरत नाही; त्यासाठी सामाजिक संरचना, सांस्कृतिक पद्धती आणि आर्थिक विषमता यांचाही सखोल विचार आवश्यक ठरतो.

मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर आत्महत्या हा प्रसंग तसा नवीन नाही. प्राचीन काळापासून विविध समाजांमध्ये आत्महत्येकडे वेगवेगळ्या नजरेने पाहिले गेले आहे. कुठे ती पराक्रमाचे, त्यागाचे किंवा सन्मानाचे प्रतीक मानली गेली, तर कुठे ती पाप, दुर्बलता किंवा अपमानाचे लक्षण समजली गेली. मात्र आधुनिक समाजशास्त्र आत्महत्येकडे केवळ वैयक्तिक कृती म्हणून न पाहता, ती समाजातील विसंगती, तणाव आणि असमानतेचे परिणाम म्हणून विश्लेषित करते. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येवर केलेला सखोल अभ्यास आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांनी आत्महत्या ही वैयक्तिक घटना नसून सामाजिक घटना आहे, असे स्पष्ट केले आहे. समाजातील एकात्मता आणि नियंत्रणाच्या प्रमाणावर आत्महत्येचे प्रकार ठरतात, असे त्यांनी दाखवून दिले. व्यक्ती समाजाशी निगडित नातेसंबंधातून प्रेरणा, आधार आणि जीवनमूल्ये घेत असते. जेव्हा हे संबंध तुटतात, जेव्हा समाजाकडून आधाराऐवजी दडपण वाढते किंवा जेव्हा व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकली जाते, तेव्हा तिच्या जगण्याची आशा मंदावते. आत्महत्या म्हणजे त्या आशेचा अंत असतो. त्यामुळे आत्महत्येकडे फक्त मानसिक आरोग्याचा प्रश्न म्हणून न पाहता समाजाच्या व्यापक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे. एमिल दुर्खीम या समाजशास्त्रज्ञाने आत्महत्येचे समाजशास्त्रीय विश्लेषण करून हे दाखवून दिले की व्यक्तीच्या जीवनातील एकाकीपणा, समाजाशी असलेले तुटलेले नाते, मूल्यांचा गोंधळ किंवा अत्यधिक सामाजिक नियंत्रण या कारणांनी आत्महत्या घडते. त्याच्या अभ्यासामुळे हे लक्षात येते की आत्महत्या ही वैयक्तिक न राहता सामाजिक वास्तवाशी जोडलेली घटना आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर आत्महत्येच्या मुळाशी 'सामाजिक संबंधांचा अभाव' हे एक महत्वाचे कारण आहे. आधुनिक काळात जरी तंत्रज्ञानाने आपल्याला जगाशी जोडले असले तरी प्रत्यक्ष मानवी नाती, संवाद आणि आधार यांचा अभाव वाढत चालला आहे. यामुळे लोक मानसिकदृष्ट्या कमकुवत होत आहेत. दुसरीकडे, समाजाने मानसिक आरोग्याकडे अद्यापही 'कलंकित' नजरेने पाहण्याची प्रवृत्ती कायम ठेवली आहे. एखादी व्यक्ती नैराश्यात आहे, तिला मानसोपचाराची गरज आहे, हे मान्य करण्याऐवजी तिला वेडसर, असामान्य समजले जाते. परिणामी लोक मदत घेण्याऐवजी शांतपणे वेदना सहन करत राहतात आणि टोकाचा निर्णय घेतात. आज जगात आणि भारतात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे 8 लाखांहून अधिक लोक आत्महत्या करतात, म्हणजे दर 40 सेकंदाला एक व्यक्ती स्वतःचे जीवन संपवते. भारत या आकडेवारीत अग्रभागी आहे. आजच्या काळात आपण पाहतो की आत्महत्येच्या घटनांमध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, बेरोजगार तरुणांच्या आत्महत्या आणि वृद्धांच्या आत्महत्या ही काही ठळक उदाहरणे आहेत. युवकांसाठी रोजगाराची असुरक्षितता, करिअरचा दबाव, नातेसंबंधातील ताणतणाव, पालक-समाजाच्या अपेक्षा या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करतात. शेतकऱ्यांच्या बाबतीत कर्जबाजारीपणा, शेतीतील अपयश, हवामानातील अनिश्चितता आणि शासकीय यंत्रणेकडून पुरेसा आधार न मिळणे ही कारणे आत्महत्येच्या मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये अपयशाची भीती, स्पर्धात्मक वातावरण, पालकांचा दबाव आणि सामाजिक तुलना हे आत्महत्येला प्रवृत्त करणारे घटक ठरतात. तर वृद्धांमध्ये एकाकीपणा, सामाजिक उपेक्षा आणि शारीरिक आजारपण यामुळे जीवननिराशा निर्माण होते.

महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा अशा भागात शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गेल्या दोन दशकांत सामाजिक आणि राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पिकाला योग्य भाव न मिळणे, कर्जाचा बोजा, पावसाचे अनिश्चित चक्र, शेतीवरील वाढलेला खर्च, आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचा ताण यामुळे शेतकरी अडचणीत येतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर हे केवळ वैयक्तिक असमर्थतेचे प्रकरण नसून कृषी धोरणातील त्रुटी, आर्थिक विषमता आणि ग्रामीण समाजाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेतील असंतुलन यांचे द्योतक आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना देखील तितक्याच वेदनादायी आहेत. शिक्षणातील स्पर्धा, पालकांची अपेक्षा, अपयशाची भीती, करिअरची असुरक्षितता यामुळे तरुण मनांना असह्य ताण सहन करावा लागतो. शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्याचे प्रश्न गांभीर्याने घेतले जात नाहीत, हे एक मोठे कारण आहे. आत्महत्येच्या या घटनांवरून हे लक्षात येते की आपली शिक्षणव्यवस्था केवळ ज्ञानदानापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे. शहरी भागातही आत्महत्येच्या घटना वाढत आहेत. महानगरांतील एकाकी जीवनशैली, सामाजिक नातेसंबंधांचा अभाव, कामाच्या ठिकाणी होणारा ताण, बेरोजगारी, कौटुंबिक विघटन, तणावपूर्ण नातेसंबंध आणि व्यसनाधीनता हे घटक आत्महत्येला कारणीभूत ठरत आहेत. विशेषतः तरुण आणि महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढलेले दिसते. समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास आधुनिकतेसोबत आलेली व्यक्तिवादी जीवनशैली, तुटलेली सामाजिक बंधने, परंपरागत आधारव्यवस्थेचे क्षरण आणि उपभोक्तावादी संस्कृतीमुळे निर्माण झालेली असुरक्षितता ही कारणे ठळकपणे समोर येतात.

स्त्रियांच्या आत्महत्यांचा विचार केला तर चित्र अधिक गुंतागुंतीचे दिसते. घरगुती हिंसा, हुंडा प्रथा, लैंगिक छळ, कौटुंबिक दडपशाही, आर्थिक स्वावलंबनाचा अभाव आणि समाजातील दुय्यम स्थान या कारणांमुळे स्त्रिया आत्महत्येस प्रवृत्त होतात. काही वेळा त्यांचे जीवन नियतीवादी आत्महत्येच्या चौकटीत बसते, कारण त्यांना त्यांच्या आयुष्यावर स्वतःचा ताबा असल्याची जाणीवच नसते. LGBTQ+ समुदायातील आत्महत्या हाही एक प्रश्न आहे. सामाजिक स्वीकाराचा अभाव, तिरस्कार, बहिष्कार आणि भेदभाव यामुळे या गटात सुद्धा आत्महत्येचे होत आहेत. यावरून स्पष्ट होते की आत्महत्या ही समाजातील असमानता, दडपशाही आणि तुटकपणाची अभिव्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने आत्महत्येचे विश्लेषण करताना सामाजिक नियंत्रण, सामाजिक ऐक्य, मूल्यव्यवस्था आणि आधारव्यवस्था या संकल्पना महत्त्वाच्या ठरतात. ज्या समाजात व्यक्तींना एकमेकांशी जोडणारे घटक मजबूत असतात, जिथे कुटुंब, समाजसंस्था आणि समुदाय आधार देतात, तिथे आत्महत्येचे प्रमाण कमी दिसते. उलट ज्या ठिकाणी व्यक्ती एकाकीपणात अडकतात, समाजाशी नाते तोडतात, किंवा मूल्यांमध्ये गोंधळ निर्माण होतो, तिथे आत्महत्येच्या घटना वाढतात. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी समाजात आपलेपणा, संवाद, सहकार्य आणि परस्पर जबाबदारीची भावना रुजवणे आवश्यक ठरते.

10 सप्टेंबर रोजी जगभरात पाळल्या जाणाऱ्या 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाच्या' निमित्ताने केवळ वैद्यकीय उपचार किंवा समुपदेशन हाच उपाय नसून, व्यापक सामाजिक उपाययोजना आवश्यक आहेत. मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार, समुपदेशन केंद्रे, हेल्पलाईन्स या उपक्रमांसोबतच शिक्षण, रोजगार, सामाजिक सुरक्षा, शेती धोरण, महिलांचे सक्षमीकरण, तरुणांच्या संधींची निर्मिती, नातेसंबंधातील संवाद यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषतः ग्रामीण समाजात आत्महत्येची कारणे सामाजिक-आर्थिक स्तरावर जास्त असतात, तर शहरी समाजात एकाकीपणा आणि ताण हे प्रमुख घटक असतात. त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या वास्तवाला समजून घेऊनच प्रतिबंधात्मक धोरण आखणे आवश्यक आहे. आजच्या काळात माध्यमांची भूमिका देखील महत्वाची आहे. आत्महत्येच्या बातम्या कशा पद्धतीने दिल्या जातात यावर समाजाचे मानसशास्त्र परिणाम करते. जर अशा बातम्या सनसनाटी स्वरूपात दिल्या गेल्या, तर त्याचा विपरीत परिणाम होतो. उलट सकारात्मक उदाहरणे, संघर्षावर मात करणाऱ्या कथा, मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणारे कार्यक्रम यांचा समाजावर चांगला परिणाम होतो. आत्महत्या ही समस्या केवळ व्यक्तीपुरती मर्यादित न ठेवता ती समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव माध्यमांनी सतत जागृत ठेवली पाहिजे.

आत्महत्या या समस्येवर उपाय शोधताना शासन आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. आत्महत्या प्रतिबंधासाठी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर कार्यक्रम राबवणे, शाळा आणि महाविद्यालयांत मानसिक आरोग्य शिक्षणाचा समावेश करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, ग्रामीण भागात शाश्वत शेतीसाठी साहाय्य करणे, समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे अशा अनेक स्तरांवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. आत्महत्येचे मूळ कारण बहुआयामी आहे, त्यामुळे त्यावर उपाययोजना देखील बहुआयामी असायला हव्यात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता आत्महत्या ही एक सामाजिक आजार आहे, आणि तिचा प्रतिबंध हा केवळ वैद्यकीय प्रश्न नाही तर सामाजिक चळवळ आहे. व्यक्तीला एकटे न सोडता, त्याच्या वेदना आणि संघर्ष समजून घेतले, तर आत्महत्या टाळता येऊ शकते. समाजाने आत्महत्येकडे 'समस्या' म्हणून न पाहता, ती 'लक्षण' आहे हे ओळखले पाहिजे. हे लक्षण दुरुस्त करण्यासाठी समाजात समता, न्याय, आपलेपणा आणि सुरक्षिततेचे वातावरण तयार करणे गरजेचे आहे.

10 सप्टेंबर रोजी जगभरात पाळला जाणारा 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' आपल्याला हीच जाणीव करून देतो की प्रत्येकाचे जीवन मौल्यवान आहे, आणि त्या जीवनाचा सन्मान करण्यासाठी आपण समाज म्हणून सजग राहिले पाहिजे. आत्महत्या हा मार्ग कधीच अंतिम उपाय नसतो. जीवन कितीही कठीण वाटले तरी समाजाच्या सामूहिक आधाराने, संवादाने, सहकार्याने आणि योग्य धोरणात्मक प्रयत्नांनी आपण जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहू शकतो. हा दिवस म्हणजे फक्त स्मरणदिन नसून, आपल्या सामाजिक जबाबदारीची पुनःप्रत्ययकारी आठवण आहे. जर आपण सर्वांनी मिळून आत्महत्येची कारणे ओळखून, ती कमी करण्यासाठी हातभार लावला, तर निश्चितच 'जीवनाचा सन्मान' ही मूल्यव्यवस्था अधिक दृढ होईल. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आत्महत्या रोखणे म्हणजे समाजाला अधिक संवेदनशील, न्याय्य आणि मानवी बनवणे होय.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक,
समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. 9960103582, ईमेल –
bagate.rajendra४@gmail.com